# फातिमा शेख

विद्यार्थी मित्र – मैत्रिणींनो नमस्ते,

तुम्ही फातिमा शेख यांचं नाव कधी ऐकलं आहे का? कुणाला सांगता येईल का त्या कोण होत्या?

अगदी बरोबर. **फातिमा शेख भारतातील पहिल्या मुस्लिम शिक्षिका होत्या.**

9 जानेवारी या दिवशी फातिमा शेख यांची जयंती साजरी केली जाते.

फातिमा कोणी साधीसुधी महिला नव्हती. **फातिमा सावित्रीबाईंची मैत्रीण आणि सहकारी होत्या. सावित्रीबाईंच्या खांद्याला खांदा लावून त्या मुलींच्या हक्कासाठी अखेरपर्यंत लढल्या.**

तुम्हांला माहितच आहे की महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी मुलींची आणि गोरगरीब मुलांची शाळा सुरू केल्यावर त्यांना खूप विरोध झाला. जोतिबांच्या वडिलांनी तर त्यांना घराबाहेर काढले. अशावेळी त्यांना राहायला घर कुणी दिले माहित आहे? **पुण्यातील गंज पेठेत राहणारे उस्मान शेख व त्यांची बहीण फातिमा शेख यांनी त्यांना राहायला घर दिले.**

ह्याच फातिमा शेख यांनी सावित्रीबाईंसोबत मुलींना शिकवायला सुरूवात केली.

तुम्हांला आश्चर्य वाटेल त्या काळात **सावित्रीबाईंनी आणि फातिमा शेख यांनी शिक्षिका बनण्याचे प्रशिक्षण घेतले होते.** त्यानंतर त्यांनी मुलींना शिकवण्याचे काम केले.

सावित्रीबाईंनी जोतिबांना लिहिलेल्या एका पत्रात फातिमा शेख यांचा उल्लेख सापडतो. सावित्रीबाईंची तब्येत खराब असताना त्यांनी 10 ऑक्टोबर 1856 रोजी जोतिबांना एक पत्र लिहिलं होतं. त्या जोतिबांना म्हणतात, **"माझी काळजी करू नका, तब्येत ठीक होताच मी पुण्यात परत येईन. फातिमाला सध्या त्रास होत असेल, पण ती कुरकुर करणार नाही."**

फातिमा शेख घरोघरी जाऊन मुलींच्या आई-वडिलांना शिक्षणाचे महत्त्व सांगायच्या. मुलींना अभ्यासासाठी घरी बोलवायच्या.

**सावित्रीबाईंना आणि फातिमांना मुलींना शिकवण्यात कितीतरी अडचणींचा सामना करावा लागला. आज सर्व मुली शिकत आहेत त्या सावित्रीबाई आणि फातिमाबी यांच्या संघर्षामुळेच. आपण आजच्या दिवशी त्यांना मनापासून वंदन करुयात.**

संदर्भ व माहिती -

**सावित्रीबाई आणि फातिमा यांचा सापडलेला एक जुना फोटो आणि सावित्रीबाईंचे पत्र पुढे दिले आहे.**



सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख त्यांच्या
शाळेतील दोन विद्यार्थिनींसह
(शंभर वर्षांपूर्वी निगेटिव्हवरून तयार केलेले दुर्मिळ छायाचित्र)

**पत्र क्र. १**

१०-१०-१८५६

सत्यरुप जोतिबास्वामी यास,
सावित्रीचा शिरसाष्टांग नमस्कार,
पत्रास कारण की,

माझ्या तबियतीत अनेकदा उलटा पालटी होऊन ताब्यावर आली आहे. या दुखण्यात भाऊने अपरिमित श्रम घेऊन माझी सेवा केली आहे. यावरून तो किती प्रेमळ आहे हे दिसून येते. मी परिपूर्ण दुरुस्त होताच पुण्यास येईन. काळजीत असू नये. फातीमास त्रास पडत असेल पण ती कुरकूर करणार नाही. अस्तु. येथे बोलण्यात बोलणे चालले असता असे घडले की, भाऊ म्हणाला, तू व तुझा नवरा वाळीत असून तुम्ही उभयता महारमांगादी अंत्यजाकरता जी कर्मे करता, ती पतित असून आपल्या कुलास बट्टा लावणाऱ्या आहेत. यास्तव सांगतो की, तुम्ही नवरा बायकोने जातीरूढीस अनुसरून व भट सांगेल त्याप्रमाणेच आचरण करावे. त्यांचे बेलगाम व असंमजस बोलणे ऐकून आई खटकन उतरून काळवंडली. भाऊ तसा दयाळू पण कोत्या बुद्धीचा असल्यामुळे त्यानी तुम्हास व मला दूषणे देऊन आपली निंदा करण्यास कमी केले नाही. आईस वाटले, ती त्यास रागे न भरता ऐकवणी करती झाली की, तुला देवाने रसवंतीसारखी काया दिली असता तिचा असा दुरुपयोग करावा हे चांगले नाही. आईचे बोलणे ऐकून भाऊ उगा राहिला व लज्जा पावून मुकाट्याने बसून राहिला. मी त्याच्या मताचे खंडन करून बोलले. भाऊ तुझी बुद्धी कोती असून भट लोकांच्या शिकवणीने दुर्बल झाली आहे. तू शेळी, गाय यांना जवळ घेऊन कुरवाळतोस, नागपंचमीस विषारी नाग पकडून त्यास दूध पाजतोस. महार मांग हे तुझ्या सम मानव असतात. त्यास अस्पृश्य समजतोस त्याचे कारण सांग? असा त्यास प्रश्न केला. भट लोक सोवळ्यात असता तुझा विटाळ मानतात. तुला महारच समजतात. माझे बोलणे ऐकून तो लज्जित झाला व पुसू लागला, महारमांगांना तुम्ही कशासाठी शिकवता? याविषयी लोक तुम्हाला अपशब्द देऊन त्रास देतात. हे मला ऐकवत नाही. मी त्यास इंग्रज लोक महारमांगासाठी काय काय करतात ते सांगून विद्याहीनता ही पशुत्वाची खूण आहे. भट लोकांच्या श्रेष्ठत्वास आधारभूत विद्या हीच होय. तिचा महिमा मोठा आहे. जो कोणी तिला प्राप्त करून घेईल त्याची नीचता दूर पळून उच्चता त्याचा अंगीकार करील. माझे स्वामी देवमाणूस आहे. त्याची सर या देशी कोणाला येणार नाही. महारमांगांनी शिकावे व माणूस म्हणून जगावे या कारणास्तव भटगुळांशी झगडत खटाटोप करणारे जोतिबा स्वामी महारमांगांना शिकवितात व मीही त्यास शिकविते. पण त्यात अनुचित काय आहे? आम्ही उभयता मुलींना शिकवितो, बायांना शिकवितो महारमांगांना शिकवितो, हेच ब्राह्मणांना अपायकारक होणार, या समजुतीच्या कारणास्तव ते आमच्या माणूस धर्माच्या कामास अब्रह्मण्यम् अब्रह्मण्यम् करीत निंदा कुटाळक्या करतात व तुझ्या सारख्याच्या मनात किल्मीष पेरतात.